दै. सकाळ 3 फेब्रुवारी २००९

269

## कमला महाविद्यालयात प्रा. माळी यांचे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २ : कमला महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनीतर्फे प्रा. जी. पी. माळी यांचे 'तुरुंगात जन्मलेल्या साहित्य कृती' या विषयावर व्याख्यान झाले. प्रा. डॉ. जे. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते.

प्रा. जी. पी. माळी यांनी सांगितले, "साहित्यकृतीद्वारे साहित्याला समृद्धता दिली जाते. प्रसंग कसाही असो, प्रतिभेला वाव देऊन लेखन केले, तर त्यातून साहित्य जन्मास येऊ शकते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अनेक देशप्रेमींना तुरुंगवास भोगावा लागला, पण त्या तुरुंगातील गजाआड त्यांच्यातील प्रतिभेला तेच पोषक वातावरण ठरले. डॉ. भारती शेळके यांनी आभार मानले. प्रा. निता धुमाळ यांनी संयोजन केले.